RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ९, अंक ३२(४)] सोमवार, ऑगस्ट १४, २०२३/श्रावण २३, शके १९४५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ४५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०२३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७.—**विवक्षित वन्य प्राण्यांमुळे मानव व पशु यांची जीवितहानी, किंवा त्यांना इजा पोहोचणे आणि पिकांचे व मालमत्तेचे नुकसान होणे यांकरिता नुकसानभरपाई प्रदान करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी विशेष तरतुदी करण्याकरिता अधिनियम. . . | १-४ |

दिनांक १२ ऑगस्ट २०२३ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**सतिश वाघोले,**
सचिव (विधि विधान), महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०२३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७.**

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **" महाराष्ट्र शासन राजपत्रात "** दिनांक १४ ऑगस्ट २०२३ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**विवक्षित वन्य प्राण्यांमुळे मानव व पशु यांची जीवितहानी, किंवा त्यांना इजा पोहोचणे आणि पिकांचे व मालमत्तेचे नुकसान होणे यांकरिता नुकसानभरपाई प्रदान करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी विशेष तरतुदी करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** विवक्षित वन्य प्राण्यांमुळे मानव व पशु यांची जीवितहानी, किंवा त्यांना इजा पोहोचणे आणि पिकांचे व मालमत्तेचे नुकसान होणे यांकरिता नुकसानभरपाई प्रदान करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी विशेष तरतुदी करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र वन्य प्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान यांकरिता नुकसानभरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३, असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देण्यात येईल अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या. **२.** (१) या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,—

(क) " पशु " याचा अर्थ, गाय, म्हैस, बैल, मेंढी, शेळी, असा आहे आणि त्यात, राज्य शासन, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा इतर पशुंचा अंतर्भाव होतो ;

(ख) " कायदेशीर वारस " किंवा " उत्तराधिकारी " याचा अर्थ, मृत व्यक्तीने तिच्या मृत्यूवेळी कोणतीही मालमत्ता मागे ठेवली असेल तर, तिच्या मालमत्तेचा वारसा मिळण्यासाठी कायद्यानुसार जी हक्कदार आहे अशी व्यक्ती, असा आहे आणि त्यात, अशा मृत व्यक्तीच्या कोणत्याही मृत्युपत्र व्यवस्थापकाचा किंवा प्रशासकाचा देखील समावेश होतो ;

(ग) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमाअन्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(घ) " नियम " याचा अर्थ, या अधिनियमाअन्वये राज्य शासनाने केलेले नियम, असा आहे ;

(ङ) " वन्य प्राणी " याचा अर्थ, वाघ, बिबट्या, अस्वल, रानगवा, रानडुक्कर, लांडगा, तरस, कोल्हा, मगर, हत्ती, जंगली कुत्रा, हरीण, नीलगाय, माकड व वानर, असा आहे आणि त्यात, राज्य शासन **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा इतर वन्यप्राण्यांचा समावेश होतो.

(२) या अधिनियमात वापरलेले परंतु यात या वर व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ यामध्ये, जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील. १९७२ चा ५३.

वन्यप्राण्यांमुळे झालेल्या हानीकरिता किंवा नुकसानीकरिता नुकसानभरपाई. **३.** (१) राज्य शासन, विवक्षित वन्य प्राण्यांमुळे मानवाला किंवा पशुंना कोणतीही इजा झाल्यास, किंवा त्यांची जीवितहानी झाल्यास अथवा पिकांचे किंवा स्थावर मालमत्तेचे नुकसान झाल्यास, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार पीडित व्यक्तींना किंवा त्यांच्या कायदेशीर वारसांना नुकसानभरपाई प्रदान करील.

(२) राज्य शासन, वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामुळे झालेल्या पुढील प्रकारच्या इजा किंवा नुकसान याबद्दल नुकसानभरपाई प्रदान करील :—

(क) मानवी जीवांची हानी ;

(ख) मानवांचे कायमस्वरूपी दिव्यांगत्त्व ;

(ग) मानवाला झालेली गंभीर इजा ;

(घ) पशु जीवांची हानी ;

(ङ) पशुंना इजा पोहोचणे ;

(च) पिकांचे, फळ झाडांचे नुकसान ;

(छ) मालमत्तेचे नुकसान ; किंवा

(ज) विहित करण्यात येतील अशा अन्य कोणत्याही प्रकारच्या इजा किंवा नुकसान :

परंतु, वन्यप्राणी रस्ता ओलांडतांना झालेल्या वाहन अपघातामुळे झालेली कोणतीही हानी, इजा किंवा नुकसान हे, वरील खंड (क), (ख), (ग), (घ) किंवा (ङ) खालील नुकसानभरपाईकरिता विचारात घेतले जाणार नाही.

(३) या अधिनियमाअन्वये प्रदेय असलेला नुकसानभरपाईचे दर, राज्य शासन, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे असतील. राज्य शासनास, वेगवेगळ्या वन्य प्राण्यांमुळे मानवास व पशुंना झालेल्या इजांकरिता अथवा पिकांना, फळ झाडांना व मालमत्तेस झालेल्या विविध प्रकारच्या नुकसानीकरिता नुकसानभरपाईचे विविध दर विनिर्दिष्ट करता येतील.

नुकसानभरपाई प्रदान करण्याची कार्यपद्धती. **४.** (१) या अधिनियमाअन्वये प्रदेय असलेल्या नुकसानभरपाईचा अर्ज, विहित करण्यात येईल, अशा नमुन्यात व अशा रीतीने आणि अशा वेळेच्या आत, अशा प्राधिकाऱ्याकडे, अशा व्यक्तींकडून करण्यात येईल.

(२) प्राधिकारी, सर्व बाबतीत परिपूर्ण असलेला पोट-कलम (१) खालील नुकसानभरपाईचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर, विहित करण्यात येईल अशा रीतीने चौकशी करील. प्राधिकारी, चौकशी केल्यानंतर, त्यावरील त्याच्या अहवालासह असा अर्ज, विहित करण्यात येईल, अशा मंजुरी प्राधिकाऱ्याकडे पाठवील.

(३) मंजुरी प्राधिकारी, अर्जासोबत जोडलेले दस्ताऐवज व प्राधिकाऱ्याचा अहवाल यांसह अर्ज विचारात घेतल्यानंतर, एकतर या अधिनियमाअन्वये प्रदेय असलेली नुकसानभरपाई मंजूर करील किंवा त्याची कारणे लेखी नमूद करून ती नाकारील :

परंतु, मंजुरी प्राधिकारी, अर्जदाराला त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय, अशा नुकसानभरपाईचा कोणताही अर्ज, नाकारणार नाही.

(४) सर्व बाबतीत परिपूर्ण असलेला अर्ज प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या कालावधीत, अर्जदाराला नुकसानभरपाई प्रदान करण्यात येईल. अशा तीस दिवसांनंतर नुकसानभरपाईच्या कोणत्याही प्रदानातील कोणताही विलंब, विहित करण्यात येईल अशा दराने, नुकसानभरपाईवर, व्याजाचे प्रदान करण्यासाठी पात्र असेल.

**५.** जर कोणत्याही व्यक्तीने, या अधिनियमाखालील नुकसानभरपाईकरिता कोणताही खोटा दावा केला असेल किंवा या अधिनियमान्वये संबंधित प्राधिकाऱ्यासमोर कोणतेही खोटे निवेदन केले असेल तर, ती व्यक्ती, एक हजार रुपयांच्या शास्तीस पात्र असेल. मंजुरी प्राधिकारी, अशा प्रकरणांमध्ये शास्ती लादील व वसूल करील. जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे, शास्ती वसूल करण्यात येईल. खोटे दावे किंवा खोटे निवेदन याबद्दल शास्ती.

**६.** शंका निरसनार्थ, याद्वारे असे घोषित करण्यात येते की, या अधिनियमामध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी केलेल्या नुकसान भरपाईच्या दाव्याच्या बाबतीत लागू असणार नाही. शंका दूर करणे.

**७.** या अधिनियमाअन्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये किंवा आदेशांन्वये सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे उद्देशित असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल, शासनाविरूद्ध, शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याविरूद्ध किंवा प्राधिकाऱ्याविरूद्ध किंवा कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही. सद्भावनापूर्वक केलेल्या कृतींस संरक्षण.

**८.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. नियम करण्याचा अधिकार.

(२) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात अथवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक क्रमवर्ती अधिवेशनांत मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीसाठी सत्रासीन असताना, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने मांडण्यात आला असेल, ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा असा कोणताही नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहे सहमत झाली तर, आणि असा निर्णय, **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करतील तर, तो नियम, अशी अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे, त्या नियमान्वये यापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**९.** (१) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.